# प्रकरण :- सहावे
# निष्कर्ष व शिफारशी

6 प्रस्तावना

संशोधनाचा विषय, ‘व्यवस्थापकीय दृष्टीकांनातून नांदेड जिल्हयांतील महिलांचा गृहिणीकडून गृहव्यवस्थापकाकडे त्या बदलाचा व्यष्टी अभ्यास’, हा आहे. या विषयांच्या संशोधनासाठी नांदेड जिल्हयांतील दहा तालुक्याची निवड केलेली आहे दहा तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातील पाच गाव व प्रत्येक गावातील दहा गृहिणीची निवड केली आहे. 500 गृहिणीची नमुना म्हणून अभ्यास केला आहे.

आपला भारत हा देश हा खेडयांचा देश आहे. जास्तीत जास्त लोक हे खेडयात राहतात. त्यांचा मुख्य व्यवसाय हो शेती करणे हा आहे. शेतीवर आधारित व्यवसायाचा विकास झालेला नाही. बचत गटांच्या मदतीने महिलांमध्ये असलेल्या कौशल्यांचा विकास होत आहे. चुल आणि मुल एवढेच तिचे जग न राहता ती आता बचत गटाच्या रुपाने तिला तिच्यात असणा-या आत्मविश्वासाची जाणीव झालेली आहे. बँकेचे व्यवहार कधीही न करणारी महिला आता कुशलतेने सर्व बँकेचे कामे करीत असताना आपण तिला पाहतो आहे. बचतगटामुळे तिचा स्वयं विकास व आर्थिक विकास होत आहे. तसेच नेतृत्व गुणांचा विकास होत आहे. गृहिणीकडून गृहव्यवस्थापक म्हणून झालेल्या बदलांचा अभ्यास करीत असताना अनेक व्यवस्थापकीय कौशल्याचा वापर महिला आपल्या कौटुंबिक कार्य करीत असताना करीत असते. कामाचे नियोजन करणे, कुटुंबातील सर्व सदस्यांना एकत्रित ठेवणे, कामाबद्दल त्यांना अभिप्रेरित करणे, कुटुबातील सर्व घटकांवर नियंत्रण ठेवणे इत्यादी.

प्रस्तुत प्रकरणात संशोधन अभ्यासाच्या निष्कर्षाची मांडणी केलेली आहे. महिला आपल्या कुटुंबातील कार्य करीत असताना व्यवस्थापकीय कार्याचा अवलंब करीत असते. गृहिणीकडून व्यवस्थापकीय कार्य होत असतात. आता व्यवस्थापकासारखे जबाबदारीने सर्व कार्य करीत आहे. यासाठी निष्कर्षाच्या आधारावर सूचना व शिफारशीची मांडणी करण्यात आलेली आहे.

## 6.1 प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टांची पूर्तता पुढीलप्रमाणे स्पष्ट होते.

1. महिलांत असलेले विविध कौशल्यांचा अभ्यास करण्यात आला.
2. कुटुंब व समाजाच्या विकासात निर्णय घेण्याच्या क्षमतेचा अभ्यास केला.
3. ग्रामीण - शहरी व शिक्षित व अशिक्षित महिलांचा अभ्यास केला आहे.
4. गृहिणीची अभिप्रेरण कौशल्ये जाणून घेण्यात आले.
5. बचत गटांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## 6.2 संशोधन अभ्यासाचे निष्कर्ष

प्रस्तुत प्रबंधनात विविध प्रकरणात आणि तथ्य संकलनाव्दारे संकलित केलेल्या माहितीच्या आधारे प्रबंधाचे लिखाण केले आहे. त्या आधारे मुल्यामापन करून निष्कर्ष काढले आहेत त पुढीलप्रमाणे आहेत.

1. कुटुंबातील गृहिणीमध्ये प्रतिनिधित्व करणे, कुटुंबातील व्यक्तिमधील मनोधैर्यात वाढ करणे, त्यांना प्रेरणा देणे, सहकार्याची भावना निर्माण केली जात आहे. महिलांत नेतृत्व गुणांचा विकास होत असल्याचे दिसून येते आहे.
2. कुटुंबातील व्यक्तिच्या समस्या सोडविणे, व्यक्तिच्या कार्यात मदत करणे, सर्वांना सहकार्य करणाऱ्या महिलांची संख्या 230(46%) आहे. यावरून निष्कर्ष काढण्यात येतो की, गृहिणीतील सहकार्य वृत्तीचा विकास होते असल्याचे दिसून येते.

3. कुंटुंबातील कार्याचे नियोजन करणाऱ्या महिलाची संख्या 432(86.4%), सर्वात जास्त आहे. यावरून असे स्पष्ट होते की, जास्तीत जास्त महिला काम करण्यापूर्वी त्या कामाचे नियोजन करतात आणि नियोजनाप्रमाणे कार्य करीत असतात.
4. कुंटुंबातील गृहिणीची त्वरित निर्णय घेणाऱ्या महिलांची संख्या 372(74.4%) सर्वाधिक असल्याचे दिसून येते. यावरून असे स्पष्ट होते की, गृहिणीची निर्णय क्षमता विकसीत होत आहे.
5. कुटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्यासाठी सर्वाधिक 485(97%) महिला प्रोत्साहन देत असतात. यावरून निष्कर्ष काढण्यात येतो की, कुटुंबातील व्यक्तिचे जास्तीत जास्त मनोबल वाढविण्याचे व प्रेरणा देण्याचे कार्य कुटुंबातील गृहिणी करीत असते.
6. कुटुंबातील व्यक्तिचे राहणीमान सुधारण्याचा सर्वाधिक 387(77.6%) महिला प्रयत्न करतात. यावरून निष्कर्ष काढण्यात येतो की, आपल्या व्यक्तिना जास्तीत जास्त चांगल्या सुविधा मिळाव्यात, त्याचे राहणीमान उंचावण्याचा सतत प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले आहे.
7. कुटुंबात सर्वाधिक 397(79.4%) महिला आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत असल्याचे दिसून येते. यावरून निष्कर्ष काढण्यात येते की, जास्तीत जास्त महिला आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपले जीवन सुलभ बनविण्याचा, श्रम, वेळ व पैसा याची बचत केली जाते.
8. आहाराचे ज्ञान असणाऱ्या महिला, प्रतिबंधात्मक लसीची व प्रथोमपचाराची माहिती असणाऱ्या महिला तसेच व्यायामाचे महत्व माहित असणाऱ्या महिलांची संख्या 483 (96.6%) सर्वाधिक असल्याचे दिसून येते. यावरून निष्कर्ष काढण्यात

येतो की महिला कुटुंबातील व्यक्तिच्या आरोग्याची काळजी घेत असल्याचे दिसून येते.

9. कुटुंबातील सर्व सदस्यासोबत योग्य समन्वय साधणाऱ्या महिलांची संख्या 427(85.5%) सर्वाधिक आहे. यावरून निष्कर्ष काढण्यात येतो की योग्य समन्वय साधून आपल्या कुटुंबाचा विकास करणाऱ्या महिला दिसून येतात.
10. कुंटुबातील उपलब्ध संपत्तीचे योग्य नियोजन सर्वाधिक 407(81.4) महिला करतात, यावरून निष्कर्ष काढण्यात येतो की, कुंटुबातील महिला उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्याचा गुण दिसून येतो.
11. कुंटुंबातील सदस्यांना बचतीची सवय लावणाऱ्या महिलाची संख्या 427(85.4%) इतकी असल्याचे दिसून येते. यावरून निष्कर्ष काढण्यात येतो की, बचतीतूनच भांडवलाची निर्मिती होत असते. चांगल्या सवयी लावण्याचे काम कुटुंबातूनच गृहिणी करीत असतात.
12. कुटुंबातील सदस्याच्या भविष्यासाठी वेगवेगळया स्वरूपात गुंतवणुक केली जाते. गुंतवणुकीचे ज्ञान असणाऱ्या महिलांची संख्या 390(78%) सर्वाधिक आहे. यावरून असे स्पष्ट होते की, महिलांत असलेल्या गुंतवणुक विषयी माहितीचा विकास होत आहे.
13. कुंटुबातील महिला त्या व्यक्तिची आवड, शारिरीक क्षमता व कौशल्य तसेच अनुभव याचा विचार करून योग्य व्यक्तिची निवड करणाऱ्या महिलांची संख्या 495(95%) सर्वाधिक असल्याचे दिसून येते. यावरुन निष्कर्ष काढण्यात येतो की, योग्य कामासाठी योग्य व्यक्तिची निवड करताना दिसून येतात.
14. कुटुंबातील सदस्यामध्ये सहकार्यवृत्ती, कार्यक्षमतेत वाढ करण्याचे कार्य गृहिणी करीत असते. एकीच्या बळाचे महत्व समजणाऱ्या गृहीणीची संख्या 250 (50%) सर्वाधिक आहे. यावरून महिलांत असलेले संघटन कौशल्य दिसून येते.

15. कौटुंबिक ध्येयाची आखणी करून ध्येयाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिलांची संख्या 463(92.60%) सर्वाधिक आहे. यावरून असे निष्कर्ष काढण्यात येते की ठरविलेले ध्येय पूर्ण करण्याची वृत्ती महिलामध्ये असल्याचे दिसून येते.
16. कुटुंबातील व्यक्तिला कार्य करण्यासाठी अधिकार प्रदान करणाऱ्या महिलांची संख्या 470(94%) सर्वाधिक आहे. यावरून स्पष्ट होते कार्य करण्यासाठी अधिकाराचीही गरज असते हे दिसून येते.
17. कुटुंबातील सदस्यांना त्यांनी केलेल्या कार्याबद्‌दल प्रोत्साहित करणाऱ्या महिलांची संख्या 485(97%) इतकी आहे. यावरून असे निष्कर्ष काढण्यात येते की कुटुंबातील सर्व सदस्यांना कार्यासाठी प्रेरणा देण्याचे कार्य कुटुंबातील गृहिणी करीत असल्याचे दिसून येते.
18. कुटुंबातील गृहिणीचे आपल्या मुलांकडे वैयक्तिक लक्ष असते. मुलांकडे वैयक्तिक लक्ष देणाऱ्या महिलांची संख्या 200(40%) असल्याचे दिसून आले आहे. यावरून असे स्पष्ट होते की, महिलांचे आपल्या मुलांकडे सर्वाधिक लक्ष असते असे दिसून आले.
19. कौटुंबिक अंदाजपत्रक तयार करणा-या 375 (75%) गृहिणी असल्याचे दिसून आले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, कुटुंबातील अंदाजपत्रकाचे कार्य सर्वाधिक गृहिणी व्यवस्थितपणे करतात.
20. कुटुंबातील 35 ते 45 वयोगटातील सर्वांधिक महिला 173(34.60%) गृहिणी म्हणून कार्य करीत आहेत आणि 60 पेक्षा वय जास्त असणाऱ्या महिला सर्वात कमी 43(8.6%) गृहिणी म्हणून कार्य करीत असल्याचे दिसून येते. यावरून असे निष्कर्ष काढण्यात येते की सर्वाधिक गृहिणी म्हणून कार्य करणाऱ्या 35 ते 45 वयोगटातील महिला आहेत.

21. गृहिणीच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करीत असताना पदवीचे शिक्षण घेतलेल्या महिलांची संख्या सर्वाधिक 218(43.6%) आहे, यावरून असे स्पष्ट होते की पदवी पर्यन्त शिक्षण घेणाऱ्या महिलांची संख्या 432(86.4%), सर्वाधिक आहे.
22. 6 ते 9 लाख वार्षिक उत्पन्न असणाऱ्या सर्वाधिक 127(25.4%) महिला आहेत.
23. कौटुंबिक कार्यात आपल्या अनुभवाचा फायदा होतो व कार्यात सुलभता येते असे मत असणाऱ्या महिलांची संख्या सर्वाधिक 478(95.6%), आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, अनुभवाचा फायदा घेवून कार्यात सुलभता आणली जाते.
24. कुटुंबात पुढाकार घेवून कार्य करणाऱ्या 372(74.4%) सर्वाधिक महिला आहेत. यावरून निष्कर्ष काढण्यात येतो की, महिलात नेतृत्व गुणांचा विकास होत आहे. कार्यात पुढाकार घेवून कार्य करण्याची वृत्ती वाढत आहे.
25. कुटुंबातील महिलांमध्ये सहनशीलता व कठोर परिश्रम करण्याची तयारी आहे असे मत असणाऱ्या महिलांची संख्या 398 (79.6%) इतकी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबातील महिलांमध्ये सहनशीलता व कठोर परिश्रम करण्याची तयारी असल्याचे दिसून येते.
26. महिलांप्रतिसाधकांपैकी बचत गटात सहभागी असणाऱ्या महिलाची संख्या 337 (67.40%) सर्वाधिक आहे. यावरून निष्कर्ष काढण्यात येतो की, बचत गटात जास्तीत जास्त महिला सहभागी होत असल्याचे दिसून येते.
27. बचत गटामुळे व्यवसाय करून उत्पन्नात वाढ होणाऱ्या महिलांची संख्या 176 (35.2 %) सर्वाधिक असल्याचे दिसून येते.
28. बचत गटामुळे स्वंय विकास होणाऱ्या महिलाची संख्या 222 (66%) इतकी आहे.

29. कुटुंबातील कार्याचे अंदाजपत्रक तयार करणाऱ्या महिलांची संख्या 475(95%) सर्वाधिक आहे. यावरून असे स्पष्ट होते की, अंदाजपत्रकाचे ज्ञान महिलांमध्ये असल्याचे दिसून येते.

## 6.3 गृहितकृत्यांची सिध्दता :

वरील निष्कर्षावरून खालील गृहितकृत्ये सिध्द होतात.

1.महिलाकडे चांगले संघटन व नेतृत्व गुण आहेत.

2.महिलांकडे व्यवस्थापकीय व गृहव्यवस्थापनाचे कौशल्य आहेत.

3. भारतीय स्त्री सहनशील व कठोर परिश्रम करणारी आहे.

4. महिला विविध क्षेत्रात कार्य करीत आहे.

## 6.4 सुचना व शिफारशी

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष काढण्यात आले असून या निष्कर्षाच्या आधारे गृहिणींच्या कार्यात अधिक सुधारणा घडून याव्यात यासाठी काही प्रमुख सुचना व शिफारशी करण्यात आल्या आहेत.

1. गृहिणींनी कार्य करण्यापुर्वी त्या कार्याचे नियोजन करावे.
2. कोणतेही कार्य प्रत्यक्ष केल्यानंतरच त्या कार्यातील अडचणी लक्षात येतात व त्यात सुधारणा करता येतात.
3. गृहकार्यात पुरुषांचा सहभाग वाढला तर स्त्रियांना अनेक क्षेत्रात सहभाग घेता येईल.
4. कार्य छोटे असो की मोठे असो कोणतेही कार्य करण्यासाठी व्यवस्थापनाची गरज असते.

5. नियोजन केल्यामुळे कार्यात सुलभता येते.
6. कुटुंबातील महिला ही कुटुंबातील कोणतेही कार्य निरपेक्ष भावनेने, मानसीक समाधानाकरीता करीत असते.
7. महिला ही कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता कुटुंबातील कार्य करीत असते. प्रत्येक कार्याचे पैशात मोजमाप केले तर गृहिणीचे कार्य खुपच महाग होईल. गृहिणीच्या कार्याची व तिच्या त्यागाची दखल घ्यावी.
8. व्यवस्थापनाचा उपयोग सर्वच क्षेत्रात केला जातो.
9. व्यवस्थापन हे एक कला आहे. व्यवस्थापन ही एक सामूहिक कृती आहे.
10. बचत गटामुळे महिलांचा आर्थिक व स्वयंविकास होतो त्यामुळे बचत गटात महिलांनी जास्तीत जास्त सहभाग वाढवावा.
11. महिलांचा गावात बचत गटात सहभाग जास्त आहे. तर शहरात गावाच्या तुलनेत बचत गटात महिलांचा सहभाग कमी आहे. शहरातील महिलांनी बचत गटात सहभाग वाढवून स्वत:चा विकास करून घ्यावा.